महाराष्ट्र टाइम्स

Marathi

# महाराष्ट्रातून १०० अब्ज डॉलर्सचे निर्यात उद्दिष्ट; 'ओडीओपी' योजनेअंतर्गत ११३ उत्पादनांना प्रोत्साहन

Maharashtra Export : देशाच्या एकूण निर्यातीत राज्याचा दुसरा क्रमांक आहे. भविष्यात राज्यातून २० ते ३० टक्के निर्यात वाढेल इतकी क्षमता आहे. राज्य सरकार...




**मुंबई :** एक जिल्हा एक उत्पादन (ओडीओपी) योजनेअंतर्गत राज्यातील ३६ जिल्ह्यांतून १३ उत्पादनांच्या निर्यातीस प्रोत्साहन दिले जाणार आहे. राज्याचे उद्योग मंत्री सुभाष देसाई यांनी ही माहिती दिली.पुढील काही वर्षात महाराष्ट्रातून १०० अब्ज डॉलर्सची निर्यात करण्याचे राज्य सरकारने उद्दिष्ट ठेवले आहे.

एमव्हीआयआरडीसी मुंबई वर्ल्ड ट्रेड सेंटरने आयोजित केलेल्या निर्यातदारांच्या कार्यशाळेत ते बोलत होते. भविष्यात जवळपास १००० उत्पादने निर्यात होतील इतकी राज्यात क्षमता आहे असा आशावाद देसाई यांनी यावेळी व्यक्त केला. इंडस्ट्री ४.० , डेटा सेंटर, रोबोटिक्स आणि इलेक्ट्रिक व्हेईकल या क्षेत्रांना सरकारने धोरणांमध्ये अतिउच्च प्राधान्य दिले आहे. येत्या काही वर्षात राज्य इलेक्ट्रिक व्हेइकल चे केंद्र बनेल, असा विश्वास देसाई यांनी यावेळी व्यक्त केला.